फौ. कि. अर्ज २०१/२०२२
MHRG09-000951-2022

## नि. क्र. ०५ खालील आदेश.

अर्जदार क्र.१ हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ (यापुढे सोयीकरीता व संक्षिप्तरित्या 'अधिनियम' असे संबोधण्यात आले आहे) कलम २३ अन्वये प्रस्तुत अर्ज स्वतःसाठी तसेच तिची मुलगी अर्जदार क्र.२ करीता प्रत्येकी र. रु. ५०००/– एकुण दरमहा र.रू. १०,०००/– सामनेवाला याच्याकडून तात्पुरती पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्ठ्यर्थ अर्जदार क्र.१ हिने तिचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.६ वर दाखल केले आहे.

२. अर्जदार क्र.१ हिने अधिनियमाच्या कलम १२ प्रमाणे मुळ अर्ज कलम १८, १९, २०, २१, २२ अन्वये संरक्षण आदेश, निवासी आदेश, आर्थिक सहाय्य, नुकसान भरपाईचे आदेश मिळण्यासाठी सामनेवाला याच्या विरूध्द दाखल केला आहे. सामनेवाला हा अर्जदार क्र.१ हिचा पती असुन त्यांचा विवाह दि. ०८.०४.२०१३ रोजी झाला आहे. दोघांचाही हा दुसरा विवाह असुन अर्जदार क्र.१ ही सदर विवाहापुर्वी घटस्फोटीत व सामनेवाला हा विधुर होता. सामनेवाला यास त्याच्या पहिल्या पत्नीपासुन मयुरेश हा १७ वर्षाचा मुलगा असुन तो इ. १२ वीत शिकत आहे. उभयतांनी त्यांचे लग्न जमवताना त्यांच्या भुतकाळाविषयी एकमेकांना संपुर्ण माहिती दिली होती. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही सामनेवाला याच्या मालकीच्या दिवा येथील घरामध्ये गेली. त्यानंतर सामनेवाला सुरुवातीचे १५ दिवस व्यवस्थित वागला व त्यानंतर त्याने त्याचा मुळ स्वभाव दाखवण्यास सुरुवात केली. तो अर्जदार क्र.१ हिस जेवण बनवण्याच्या पध्दतीवरुन अपमानास्पद बोलत असे. तो तिचा सतत शारिरीक, मानसिक छळ करत असे. तो तिच्या वागण्यावरुन तिला 'त्यामुळेच तुला अगोदरच्या नव–याने सोडली असे' असे म्हणायचा. त्याबाबत अर्जदार क्र.१ हिने त्याला आपल्या पुर्व आयुष्याबाबत बोलायचे नाही असे लग्न करण्यापुर्वी ठरले

असतानाही तो विषय का काढता असे विचारले असता सामनेवाला तिला बेदम मारहाण करायचा. जुन २०१३ मध्ये सामनेवाला याने कोणत्याही कारणाशिवाय अर्जदार क्र.१ हिस शिवीगाळ करुन बेदम मारहाण केली. त्यामुळे तिने त्याबाबत भितीच्या आकांताने तिच्या माहेरच्यांना कळविले. तिने सामनेवाला विरुध्द मुंब्रा पोलीस ठाण्यात तक्रार देखील दिली. सामनेवालाच्या बेदम मारहाणीमुळे तिच्या जिवितास धोका उत्पन्न झाल्यामुळे ती तिच्या माहेरच्यांसोबत माहेरी निघुन गेली. परंतु त्यानंतर तिला तिचा संसार टिकवायचा असल्यामुळे तिने व तिच्या माहेरच्यांनी पुढाकर घेवुन सामनेवालासोबत बैठक घेतली असता सामनेवाला याने सर्वांसमक्ष चुकांची कबुली देवुन अर्जदार हिस व्यवस्थित नांदविण्याची लेखी हमी दिली. परंतु त्यानंतरही सामनेवालाच्या वागण्यात बदल झाला नाही. अर्जदार क्र.१ ही गरोदर राहिली असतानाही तो तिला फटके मारणे, टोचुन बोलणे, शिवीगाळ करणे असे कृत्य करत होता. त्याने तिला माहेरी बाळंतपणासाठी जाण्यासही नकार दिला. अर्जदार क्र.२ हिचा दि.०३.०३.२०१६ रोजी सातव्या महिन्यात प्रसुती होवुन जन्म झाला. ती नाजुक असल्यामुळे तिला इनक्युबेटरमध्ये ठेवले होते. त्यावेळी अर्जदार क्र.१ हिच्या भावाने आर्थिक मदत केली. सामनेवाला याने त्यावेळी लक्ष दिले नव्हते. सामनेवाला हा अर्जदार क्र.१ कडे व्यवसायाकरीता टेम्पो घेण्यासाठी तिच्या आईवडीलांकडुन तिला र. रु. १,२०,०००/- आणण्याची जबरदस्ती करत असे. त्या कारणास्तव तो तिला शिवीगाळ व मारहाण करु लागला. त्यानंतर त्याने टेम्पो विकत घेतला व टाटा हॉस्पीटल, परेल येथे रस्त्याच्या कडेला पाण्याच्या बाटल्या, फाईल्स, आयकार्ड इत्यादी विक्री करण्याचा व्यवसाय सुरु केला. अर्जदार क्र.१ संसार सांभाळुन त्याला व्यवसायात मदत करत असे. दि.१९.०९.२०२२ रोजी तिने व्यवसायाच्या ठिकाणी जाताना चुकुन दुधाची रिकामी पिशवी ओटयावर ठेवल्यामुळे सामनेवाला याने तिला शिवीगाळ करुन घरातुन निघुन जाण्याची भाषा केली. दि.२२.०९.२०२२ रोजी अर्जदार क्र.१ हिच्याकडुन कामावर जायच्या नादात भात करपला त्यावरुन देखील सामनेवाला याने तिच्याशी वाद घातला. तिने त्याबाबत तिच्या वडीलांना फोन करुन सांगितल्यानंतर फोन ठेवताच सामनेवाला याने तिच्या अंगावरील कपडे फाडुन, उजवा हात जोरात ओढुन तिला

खाली पाडले. त्यामुळे तिचा हात सांध्यातुन सरकला. त्याने पॅंटचा पट्टा काढुन तिचा गळा आवळला त्यावेळी मयुरेश याने मध्ये पडुन अर्जदार क्र.१ हिस सोडविले. सामनेवाला याने त्यावेळी तिच्या अंगावर माचिसची जळती काडी टाकुन तिच्यावर चाकु देखील उगारला होता. सदर बाबत अर्जदार क्र.१ हिच्या माहेरच्यांना कळल्यानंतर दि.२४.०९.२०२२ रोजी ते अर्जदार क्र.१ हिच्या घरी आले व त्यांनी अर्जदार क्र.१ हिच्या जिवाला भिती निर्माण झाल्यामुळे तिला अर्जदार क्र.२ सह माहेरी नेले. अर्जदार क्र.१ हिने मयुरेश यास लहान असताना सांभाळले असुन तिला त्याच्याबद्दल माया आहे. तो देखील अर्जदार क्र.१ व २ यांना भेटण्यासाठी अर्जदार क्र.१ च्या माहेरी आला होता. अर्जदार क्र.१ सामनेवालाच्या अशा वागणुकीमुळे माहेरी राहत आहे. ती विभक्त राहात असलेल्या काळात सामनेवाला याने तिची तसेच मुलगी अर्जदार क्र.२ हिची पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी घेतली नाही. तो शारिरीकदृष्या सक्षम असुन तो करत असलेल्या व्यवसायापासुन त्याला दरमहा र. रु. ३०,०००/- उत्पन्न मिळत आहे. त्याने दिवा येथील त्याच्या मालकीची खोली भाडयाने दिली असुन त्याच्या गावी देखील घरदार व शेती आहे. याउलट अर्जदार क्र.१ हिचे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. असे असतानाही सामनेवाला याने अर्जदार क्र.१ व २ यांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी न स्विकारल्यामुळे अर्जदार क्र.१ हिस सामनेवाला याच्याकडुन आर्थिक सहाय्य मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज दाखल करावा लागला आहे.

३. सामनेवाला याने त्याचे सविस्तर म्हणणे नि.क्र.३० वर दाखल केले आहे. त्याने अर्जदार क्र.१ व २ सोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहे परंतु इतर संपुर्ण मजकुर नाकारला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, लग्नानंतर अर्जदार क्र.१ मुंबई येथे राहण्याचा तगादा लावत असे, परंतु त्याला वृध्द आईवडीलांना सोडुन घराबाहेर पडणे अशक्य होते, त्याच बाबीचा मनात राग धरुन अर्जदार क्र.१ सामनेवाला याच्याशी वाद घालत असे. ती सामनेवालावर दबाव आणण्यासाठी माहेरच्या माणसांची तसेच मुंब्रा पोलीस ठाण्यात केस दाखल करण्याची धमकी देत असे. लग्नानंतर ती कोणत्या ना कोणत्या कारणावरुन सामनेवालासोबत वाद घालत असे. कोरोना काळात सामनेवालाकडे उत्पन्नाचे

कोणतेही साधन नसल्यामुळे तो घरातच बसुन असे. त्यामुळे अर्जदार क्र.१ त्याच्याशी वाद घालत असे. दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी अर्जदार क्र.१ हिचा भाऊ तुकाराम त्याची पत्नी अनिता व इतर नातेवाईक यांना अर्जदार क्र.१ हिने कारण नसताना बोलावुन घेतले. त्यांनी सामनेवाला यास त्याची लायकी काढुन अपमानित केले. एप्रिल २०२२ मध्ये मोतीबिंदुच्या शस्त्रक्रियेमुळे सामनेवाला यास व्यवस्थित दिसत नसतानाही अर्जदार क्र.१ त्याचा त्याग करुन निघुन गेली आहे. सामनेवाला याने तिच्या माहेरी जावुन बैठक घेवुन तिची समजुत काढण्याचा प्रयत्न केला परंतु ती कोणाचेही ऐकण्यास तयार नाही. अर्जदार क्र.१ हिच्या हट्टी स्वभावामुळे त्याला अर्जदार क्र.२ च्या प्रेमापासुन वंचित रहावे लागत आहे. सन २०१९ मध्ये त्याने स्वतः बँकेतुन सोने तारण कर्ज घेवुन व्यवसायाकरीता टेम्पो नोंदणी क्र.एम.एच.४८/ए.जी.१०७४ विकत घेतला आहे परंतु त्याचे फिटनेस प्रमाणपत्र संपल्याने व नुतनीकरण करण्यासाठी त्याच्याकडे पैसे नसल्याने सदर टेम्पो भोईवाडा पोलीसांनी जमा केला आहे. शेवटी सामनेवाला याने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विंनती केली आहे.

४. अर्जदार क्र.१ तर्फे विधीज्ञ श्रीमती एम. एम. पाटील व सामनेवालातर्फे विधिज्ञ श्री. ए. पी. दांडेकर यांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही पक्षाच्या कथनांवरुन खालील मुद्दे उपस्थित होतात त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला याने तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे काय? | होय. |
| २. | अर्जदार क्र.१ ही स्वतः व अर्जदार क्र.२ करीता प्रस्तुत अर्जात मागणी केल्याप्रमाणे तात्पुरते आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र | अंशतः होय. |

आहे काय ?

३. आदेश काय ? अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता:-</u>**

५. अर्जदार क्र.१ हिने मुळ अर्जामध्ये सामनेवाला याने तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याबाबत कथन केले आहे. तिचे तिच्या कथनांपुष्ठयर्थ तिचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. याउलट सामनेवाला याने देखील नि.क्र.३० वरील कैफियतीद्वारे अर्जदार क्र.१ हिच्या वर्तणुकीबाबत आरोप केले आहेत. सद्यस्थितीत संपुर्ण पुरावा पटलावर न आल्यामुळे त्यांच्यापैकी कोणाची केस जास्त संयुक्तीक आहे किंवा कोणाच्या कथनात तथ्य आहे हे पाहणे आवश्यक आहे. उभयपक्षांनी एकमेकांसोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहेत. अर्जदार क्र.१ हिने तारखेनिशी तपशीलवार सामनेवाला याच्या वर्तणुकीबाबत आरोप केले आहेत. याउलट सामनेवाला याने त्याच्या कैफियतीमध्ये अर्जदार क्र.१ विषयी मोघमपणे आरोप केले आहेत. त्याने एकाही विशिष्ट घटनेचा तारखेसह तपशील दिला नाही. आणखी महत्वाचे म्हणजे सामनेवाला याने त्याच्या बचावामध्ये अर्जदार क्र.१ व २ त्याच्यापासुन विभक्त राहात असल्याचे मान्य केले आहे.परंतु सदर कालावधीत त्याने अर्जदार क्र.१ हिचा पती व क्र.२ चा पिता म्हणुन त्यांच्या पालनपोषणासाठी कोणतीही आर्थिक मदत केल्याचा त्याचा बचाव नाही. अर्जदार क्र.१ हिचा पती व क्र.२ चा पिता म्हणुन त्यांच्या पालनपोषणाची सामनेवालावर कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. अधिनियमाच्या कलम ३ प्रमाणे अर्जदार क्र.१ व २ यांना त्यांच्या आर्थिक गरजांपासुन वंचित ठेवणे हे देखील 'आर्थिक छळ' या व्याख्येमध्ये समाविष्ट होणारा कौटुंबिक हिंसाचार आहे. अशाप्रकारे

अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला याने तिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिध्द केले आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ करीता:-</u>**

६. मुद्दा क्र.१ च्या होकारार्थी निष्कर्षाच्या अनुषंगाने अर्जदार क्र.१ ही कौटुंबिक हिंसाचाराची पिडीता म्हणुन सामनेवाला याच्याकडुन आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे. अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला याच्या आर्थिक क्षमतेविषयी निश्चित पुरावा दाखल केला नसला तरी सामनेवाला याने त्याच्या स्वतःच्या मालकीचा टेम्पो असल्याचे व तो टेम्पो त्याने व्यवसायासाठी विकत घेतल्याचे मान्य केले आहे. सदर टेम्पो फिटनेस सर्टिफिकेटची वैधता संपल्यामुळे पोलीस ठाण्यात जमा करण्यात आल्याच्या त्याच्या कथनापुष्टयर्थ त्याने कोणताही कागद पटलावर दाखल केला नाही. जरी टेम्पो त्याच्या ताब्यात नसेल तर सद्यस्थितीत तो कोणते काम करत आहे याबाबत देखील त्याने निश्चित कोणतेही विधान केले नाही. उभयपक्षांनी त्यांचे मालमत्ता व दायित्व प्रकटीकरण शपथपत्र दाखल केले नसल्यामुळे दोघांच्याही आर्थिक परिस्थितीविषयी निश्चित कोणतेही अनुमान काढता येत नाही. परंतु सध्याची महागाई अर्जदार क्र.१ वर अर्जदार क्र.२ ची असलेली जबाबदारी विचारात घेता अर्जदार क्र.१ ही स्वतःकरीता सामनेवाला याच्याडुन दरमहा र.रु.३०००/- व अर्जदार क्र.२ करीता दरमहा र.रु.१०००/- तात्पुरत्या स्वरुपात अर्ज दाखल तारखेपासुन पोटगी मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ पुढील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाल याने अर्ज दाखल दि.१४.१२.२०२२ पासुन अर्जदार क्र.१ करीता दरमहा र. रु. ३०००/- व अर्जदार

क्र.२ करीता दरमहा र. रु.१०००/- तात्पुरत्या पोटगी स्वरुपात दयावे.

३. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना मोफत द्यावी.

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.12.08 15:58:24 +0530

स्थळ: रोहा.
दि.०६.१२.२०२५

(सं.वि.खैरे)
न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.